शिक्षण विभाग(प्राथमिक),जि.प.नाशिक
जि.प.भवन,त्र्यंबक नाका,नाशिक ४२२००१०
दुरध्वनी क्रमांक(कार्यालय) ☎-०२५३-२५०८०७५ e mail-mdmnashik@gmail.com

---

जा.क्रं.जिपना/शिक्षण/प्राथ-२/ ७८४ / २०१८.
नाशिक दिनांक :- १०/०४/२०१८.
७९

प्रति,
गटशिक्षणाधिकारी
पंचायत समिती----------------(सर्व)

**विषय:-** जिल्हा परिषद नाशिकच्या प्राथमिक शिक्षक,पदवीधर प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक, संवर्गाच्या सर्वसाधारण बदल्या सन-२०१८

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन,ग्राम विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक:जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था-१४ दिनांक-२७/०२/२०१७

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद नाशिकच्या प्राथमिक शिक्षक, पदवीधर प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक, संवर्गाच्या सर्वसाधारण बदल्या सन-२०१८ च्या अनुषंगाने संदर्भिय शासन निर्णयानुसार या कार्यालयाचे दिनांक १३/४/२०१७ व २५/१/२०१८ च्या पत्रान्वये अवघड क्षेत्र व सर्वसाधारण क्षेत्रातील शाळांच्या याद्या, दिनांक ७/३/२०१८ च्या पत्रान्वये बदलीपात्र व बदली अधिकार प्राप्त शिक्षकांच्या अंतीम वास्तव्य जेष्ठता याद्या, दिनांक ९/३/२०१८ च्या पत्रान्वये अवघड क्षेत्रातील महिलांसाठी प्रतिकूल असलेल्या शाळांची याद्या आणि दिनांक २२/३/२०१८ च्या पत्रान्वये अवघड क्षेत्रातील महिलांसाठी प्रतिकूल असलेल्या शाळांमधील बदली अधिकार प्राप्त महिला शिक्षकांच्या याद्या प्रसिध्द केलेल्या आहेत. या बाबी आपणास ज्ञात आहेतच.

तसेच दिनांक २३/३/२०१८ ते ०५/०४/२०१८ या कालावधीत C.M.C.S. College Nashik येथील संगणक लॅब मध्ये आपण तथा आपले प्रतिनिधी यांनी Transfer Portal वर CEO Login मधून खालीलप्रमाणे शाळानिहाय माहितीचे Mapping चे कामकाज केलेले आहे.

1) School wise positions details for Transfer Under Consideration (TUC)
2) School wise positions details for Clear vacancies
3) School wise Position Details For Transfer By Right (TBR)
4) School wise Position Details For Compulsory Vacancy Position.
5) TUC Teacher Mapping

उपरोक्त माहितीच्या आधारे आता बदली प्रक्रीयेमध्ये विशेष शिक्षक संवर्ग भाग-१ व विशेष शिक्षक संवर्ग भाग-२ मधील शिक्षकांना फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरीत शिक्षकांनाही लवकरच फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. करीता संबधीत शिक्षकांना आपले फॉर्म भरणे सुलभ व्हावे यासाठी खालील माहिती शिक्षकांसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

1) शाळानिहाय बदलीपात्र शिक्षक संख्या-School wise positions details for Transfer Under Consideration (TUC)
2) शाळानिहाय रिक्त जागांची माहिती - School wise positions details for Clear vacancies
3) शाळानिहाय समानिकरणासाठी रिक्त ठेवावयाच्या पदांची माहिती- School wise Position Details For Compulsory Vacancy Position.
4) शाळा निहाय बदलीपात्र शिक्षकयादी - TUC Teacher List
5) शाळानिहाय अतिरिक्त शिक्षकसंख्या-

उपरोक्त १ ते ५ मधील माहिती आपले गटातील सर्व शिक्षकांसाठी zpnashik. maharasatra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. गटस्तरावर देखील शिक्षका..ना सदरील माहिती उपलब्ध व्हावी यासाठी प्रसिध्द करण्यात यावी. सदर प्रकरणी उपरोक्त माहिती गटावर उपलब्ध झाली नाही अशी तक्रार होणार नाही याची दक्षता घ्यावी. या अनुषंगाने काही तक्रारी उद्भवल्यास त्यास आपण जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी.

स्थळप्रतीवर मा.शि.अ.(प्रा) यांची स्वाक्षरी असे.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद,नाशिक

प्रत-मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नाशिक यांना माहितीस्तव सादर.
मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि) जि.प.नाशिक यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सविनय सादर.
२/- वरील प्रमाणे प्राथमिक शिक्षक जिल्हांतर्गत बदल्यांबाबतची उपरोक्त १ ते ५ मधील माहिती जि.प.नाशिकच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी ही विनंती.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
जिल्हा परिषद,नाशिक



Scanned by CamScanner